ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# प्रबुद्ध रंगभूमीच्या 'संवाद युगनायकांचा' या नाटकातील इतिहास मीमांसा




**कल्याण नामदेव श्रावस्ती**
**पीएचडी (मराठी) संशोधक विद्यार्थी :- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर.**

## प्रस्तावना :-

प्रबुद्ध रंगभूमीचे संस्थापक नाटककार टेक्सास गायकवाड लिखित **संवाद युगनायकांचा** या नाटकाचा विषय छ.शिवाजी महाराज यांच्या इतिहासासंबंधी आहे. छ.शिवाजी महाराज यांचा कालखंड इ.स.1630 ते 1680 असा आहे. तर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा कालखंड इ.स.1891 ते 1956 हा आहे. या दोन महापुरुषांची प्रत्यक्षात भेट झालेली नाही. तथापि या दोन महापुरुषांची विचारसरणी समान होती. दोन्ही महापुरुषांनी सर्वसामान्य गरीब बहुजनांच्या उध्दाराचे कार्य केले आहे. छ.शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी त्यांच्या त्यांच्या कालखंडात विषमतावादी, ब्राह्मण्यवादी व्यवस्थेशी संघर्ष करुन समता निर्माण केली. ब्राह्मण्यवादी इतिहासकारांनी जातवर्चस्वासाठी छ.शिवाजी महाराजांच्या इतिहासात खोट्या बाबी लिहून इतिहासाचे विकृतीकरण केले आहे. सत्यशोधक क्रांतीसुर्य जोतीराव फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी ब्राह्मण्यवाद्यांच्या लिखित धर्मग्रंथाची, इतिहासाची चिकित्सा करुन सत्य इतिहास लोकांसमोर मांडला. आज फुले आंबेडकरांना आदर्श मानणारे अनेक इतिहास संशोधक इतिहास लेखनामध्ये ब्राह्मण्यवाद्यांनी केलेली षडयंत्रे उघडकीस आणून सत्य वास्तव इतिहास लेकांसमोर मांडत आहेत. छ.शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची प्रत्यक्ष भेट जरी झाली नसली तर कलेच्या कल्पनामय प्रतिभेने नाटककार टेक्सास गायकवाड यांनी **संवाद युगनायकांचा** या नाटकांत छ.शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांची भेट झाली, त्यांच्यात संवाद झाला तर! अशी कल्पना करुन डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि छ.शिवाजी महाराज एकमेकांना प्रश्न विचारुन ब्राह्मण्यवादी इतिहासकारांनी इतिहास लेखनात केलेल्या बदमाशीचा आणि त्यांच्या हेतूचा पर्दापाश करतात. असे कथानक असलेले हे नाटक छ.शिवाजी महाराजांच्या सत्य इतिहासावर प्रकाशझोत टाकते. त्याचा शोध प्रस्तूत शोध निबंधात घेतला आहे.

## ❖ संशोधनाची उद्दिष्ट्ये :-

1) छ.शिवाजी महाराजांच्या इतिहासात ब्राह्मण्यवादी इतिकासकारांनी लिहिलेल्या खोट्या बाबी आणि सत्य (वास्तव) इतिहास याचा शोध घेणे.

2) ब्राह्मण्यवादी इतिहासकारांनी छ.शिवाजी महाराज यांचा खोटा इतिहास लिहिण्यामागे त्यांचा कोणता हेतू, उद्देश होता याचा शोध घेणे.

**'संवाद युगनायकांचा या नाटकातील इतिहास मीमांसा'**

1) ब्राह्मण्यवादी इतिहासकारांनी, बखरीकारांनी, शिवशाहीर म्हणवून घेणाऱ्यांनी भवानी मातेने शिवाजी महाराजांना तलवार दिली होती म्हणूनच महाराजांनी महापराक्रम केला आणि विजय मिळविला असे असत्य लिहिले, सांगितले. छ.शिवाजी महाराज भवानी मातेसमोर डोळसपणे नतमस्तक होत होते. शिवरायांचे वडील शहाजीराजे यांना पोर्तुगीजांनी हिकमतीने बनविलेली तलवार भेट म्हणून दिली होती. शहाजीराजांनी तीच तलवार शिवरायांकडे सुपुर्त केली. छ.शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे श्रेय दैवी शक्तीला देवून छ.शिवाजी महाराजांच्या कर्तृत्वाला नाकारणे हा ब्राह्मण्यवादी इतिहासकारांचा हेतू असल्यामुळे ते छ.शिवाजी महाराजांचे दैवतीकरण करतात. छत्रपती शिवाजी महाराजांना आदर्श मानणाऱ्या बहुजनांनी स्वकर्तृत्वावर विश्वास न ठवेता दैवी शक्तीवर विश्वास ठेवावा असा अंधश्रध्दाळू विचार रुजविण्यासाठी ब्राह्मण्यवादी इतिहासकार या खोट्या बाबींचा प्रचार-प्रसार करतात.
2) छ.शिवाजी महाराजांना जिजाऊ मॉसाहेबांनी घडवले. संत तुकारामांच्या विचारांचा छ.शिवाजी महाराजांवर प्रभाव होता. तथापि छ.शिवरायांच्या महान कार्य कर्तृत्वाचे श्रेय स्वजातीकडे घेण्यासाठी ब्राह्मण्यवादी इतिहासकारांनी शिवरायांचे गुरु म्हणून स्वजातीतल्या लोकांचा उल्लेख केला आहे.
3) ब्राह्मणी व्यवस्थेने छ.शिवाजी महाराजांना शूद्र म्हणून त्यांच्या राज्याभिषेकास विरोध केला होता. त्यावेळी ब्राह्मण्यवादी इतिहासकार ज्यांना शिवरायांचे गुरु म्हणतात त्यांनी कोणतीच क्रिया, प्रतिक्रिया केल्याचा पुरावा इतिहासात उपलब्ध नाही.
4) छ.शिवाजी महाराजांनी शाक्त पध्दतीने ब्राह्मण पुरोहिताशिवाय द्वितीय राज्याभिषेक करवून घेतला. याचा अर्थ छ.शिवाजी महाराजांनी 'मनुस्मृती' ला ठोकरले हा सत्य इतिहास आहे.
5) वैदिक कर्मकांडानी समुद्र सफर पाप मानले. छ.शिवाजी महाराजांनी समुद्रावरचे आरमार सुरु करुन वैदिकांची अंधेश्रध्दा मोडीत काढली. याचा अर्थ छ.शिवराय हे विज्ञाननिष्ठ होते.
6) शिवरायांनी महार, मांग, रामोशी या बहुजन समाजातील अठरापगड जातींच्या मावळ्यांना स्वराज्यात शस्त्र धारण करण्याचा अधिकार दिला. तसेच किल्लेदार, सैनिक म्हणून महत्त्वाच्या पदांवर नेमणूक करुन शिवरायांनी सामाजिक समतेचा आदर्श निर्माण केला. धर्मशास्त्रातील (मनस्मृती मधील) चार्तुवर्ण व्यवस्था छ.शिवरायांनी नाकारली.
7) प्रतापगडावर अफझलखानाच्या वतीने वकील म्हणून आलेल्या आणि शिवरायांवर तलवारीने हल्ला करणाऱ्या कृष्णाजी भास्कर कुलकर्णी या स्वराज्यद्रोही ब्राह्मणांस शिवरायांनी ठार मारले. ब्रह्महत्या हे घोर पाप आहे अशी ब्राह्मण्यवाद्यांनी रुजवलेली अंधश्रध्दा शिवरायांनी नाकारली.
8) छ.शिवाजी महाराजांना गो-ब्राह्मण प्रतिपालक असे ब्राह्मण्यवाद्यांनी हेतू पुरस्सर संबोधले आहे. छ.शिवाजी महाराज हे सर्व बहुजन रयतेचे पालनकर्ते होते. ब्राह्मण्यवाद्यांनी छ.शिवरायांना मानणाऱ्या बहुजनांनी ब्राह्मणशाही विरोधी भूमिका घेवू नये, ब्राह्मणांविरुध्द संघर्ष करु नये यासाठी जाणीवपूर्वक ते छ.शिवरायांचा उल्लेख गो-ब्राह्मण प्रतिपालक असा करतात.
9) ब्राह्मण्यवाद्यांनी जसे शिवरायांच्या इतिहासाचे असत्य लिखाण करुन विकृतीकरण केले आहे, तसेच शंभूराजांच्या बाबतही चारित्र्यहनन करणारे बदनामीकारक असत्य लिहिले आहे. वास्तविक शिवपुत्र शंभूराजे शिवरायांप्रमाणेच महापराक्रमी आणि चारित्र्यसंपन्न होते. बहुजन समाजाला खोटा इतिहास सांगून भ्रमित करण्यासाठी ब्राह्मण्यवाद्यांनी हे कपटकारस्थान केले आहे.

10) शिवरायांच्या घराण्याचे आणि महार जातीचे अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते असे नाटककाराने ऐतिहासिक सत्य मराठा आणि महार या दोन समाजात बंधुभाव निर्माण करावा या हेतूने लिहिलेले आहे.

## ❖ निष्कर्ष

1. ब्राह्मण्यवादी इतिहासकारांनी, बखरीकारांनी, शिवशाहीर म्हणवून घेणाऱ्यांनी ब्राह्मण जातीचे वर्चस्व टिकवण्यासाठी छ.शिवरायांच्या इतिहासात खोट्या बाबी लिहून इतिहासाचे विकृतीकरण केले आहे.
2. छ.शिवाजी महाराज हे दैववादी नव्हते, तर प्रयत्नवादी होते. अंधश्रद्धाळू नव्हते तर विज्ञाननिष्ठ होते.
3. छ.शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या दोन्ही महामानवांनी ब्राह्मण्यवादी विचारांना नाकारले आणि सामाजिक समता निर्माण करण्यासाठी आयुष्यभर संघर्ष केला.
4. संवाद युगनायकांचा या नाटकातून ब्राह्मण्यवादी इतिहासकारांचा खोटा इतिहास खोडून काढून, खरा सत्य वास्तव इतिहास प्रबुद्ध रंगभूमीचे संस्थापक नाटककार टेक्सास गायकवाड यांनी कलात्मक रीतीने मांडलेला आहे.
5. **संवाद युगनायकांचा** या नाटकांतून सत्य इतिहास मांडणी केल्यामुळे मराठा, महार, मांग, धनगर इत्यादी सर्व बहुजन समाजांतील जाती-जातींमध्ये परस्परांत बंधुभाव निर्माण होतो. कारण छ.शिवाजी महाराज आणि डॉ.बाबासाहेब आंबेडकर या महामानवांचे विचारसरणी विषमतावादी जातीव्यवस्थेचे निर्मुलन करुन समतावादी समाज निर्माण करणे हीच आहे. हा सत्य इतिहास या नाटकात मांडल्यामुळे हे नाटक शिवअनुयायी आणि भीमअनुयायी यांच्यामध्ये बंधुभाव निर्माण करते.

## ❖ संदर्भग्रंथ

1. **संवाद युगनायकांचा** (प्रबुद्धनाट्य) :- **ले.भीमपुत्र टेक्सास गायकवाड**, प्रबुद्ध प्रकाशन सोलापूर, प्रथमावृत्ती, ऑगस्ट 2016.